| MHSN110010472022 | फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१९५/२०२२<br>विलास नरळे / संतोष आडसुळ |
|---|---|

<u>**निशाणी १ खालील आदेश**</u>

प्रस्तुतचा अर्ज विलंब क्षमापित करण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. याकामी फिर्यादीने सादर केलेल्या बाजूप्रमाणे त्याला दिनांक २०/०८/२०२२ पर्यंत फिर्याद दाखल करणे गरजेचे होते. मात्र तो तापाने आजारी होता आणि त्यामुळे तो दवाखान्यात आंर्तरुग्ण म्हणून दाखल होता. त्याला डॉक्टरांनी विश्रांती घेण्याचा सल्ला दिला होता. त्यामुळे दिनांक ३०/०९/२०२२ पर्यंत त्याला विश्रांती घ्यावी लागली. त्यामुळे झालेला विलंब क्षमापित करण्याची मागणी त्याने अर्जाद्वारे केलेली आहे. सदरचा विलंब त्याने जाणूनबुजन केलेला नाही. वादातील धनादेश हा सोळा लाखांचा असल्यामुळे विलंब क्षमापित न झाल्यास त्याचे अपरिमित नुकसान होवू शकते. म्हणून अर्ज मंजूर करावा अशी त्याने मागणी केली. या अर्जाच्या पृष्ठ्यर्थ त्याने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल कले आहे. एकंदरीत चौकशी वरुन असे दिसून येते की, फिर्याद दाखल करण्यासाठी झालेला विलंब फिर्यादीने योग्य असा पुरावा देवून त्याचे समाधानकारक असे कारण दिलेले आहे. त्यामुळे या प्रकरणात गुन्ह्याची दखल घेण्यास कोणतीही बाधा दिसून येत नाही. आदेशिका जारी करण्यापूर्वी आरोपीला ऐकण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**आदेश**

१. विलंब क्षमापित करुन अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मूळ फिर्याद संक्षिप्त फौजदारी खटला म्हणून नोंदविण्यात यावी.

VINAYAK DATTATRAY PATIL Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL Date: 2022.11.22 10:35:49 +0530

आटपाडी. (वि. द. पाटील)

दिनांक : २१/११/२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आटपाडी

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 21/11/2022 |
| Order signed by the Presiding Officer | : | 21/11/2022 |
| Order uploaded on | : | 22/11/2022 |